# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

''सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ''
नॅकद्वारा पुर्नमूल्यांकित 'अ' श्रेणी प्राप्त

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

Website: www.nagpuruniversity.org, E-mail : infoarcollege@ymail.com | दूरध्वनी: (०७१२)२५२९९३२

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, सिव्हील लाईन, नागपूर – ४४० ००१.


क्रमांक : रातुमनावि/मविवि/१८/पदव्यु. प्रवेश/8396 दिनांक : १३ जुलै २०१८

## :: प रि प त्र क ::

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधित विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता प्रवेशासाठी इच्छुक संबंधीत विद्यार्थ्यांना कळविण्यात येत आहे की, सत्र २०१८–१९ या शैक्षणिक सत्रापासून विद्यापीठाने सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रीया ही केन्द्रीय प्रवेश प्रक्रीया ऑनलाईन पद्धतीने एकूण तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

ऑनलाईन केन्द्रीय प्रवेश पद्धतीच्या प्रक्रीयेमध्ये प्रत्येक अभ्यासक्रमासाठी प्रवेशाच्या दोन फेरी ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे. त्यानंतर उर्वरित रिक्त प्रवेशांच्या जागांवर तिसऱ्या फेरीमध्ये विद्यापीठाने जाहिर केलेल्या गुणवत्ता यादी मधील विद्यार्थ्यांना तिसऱ्या फेरीमध्ये महाविद्यालयांच्या स्तरांवर विद्यापीठाने जाहिर केलेल्या प्रवेश वेळापत्रकामध्ये दिलेल्या कालावधीमध्ये प्रवेश करावेत.

सदरची प्रक्रीया राबविण्याकरिता महाविद्यालयांनी स्वतंत्र वेळापत्रक तयार करून तिसऱ्या फेरीतील प्रवेश Upload करण्यासाठी प्रत्येक विभाग/महाविद्यालय यांच्या Log-in-ID मध्ये लिंक देण्यात आलेली आहे. सदरचे प्रवेश करतांना ही लिंक उघडून त्यामध्ये ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचा आहे त्यांचा Control ID (प्रवेश अर्जावर नमूद केलेला/गुणवत्ता यादीमध्ये दिलेला) टाकावा व त्या विद्यार्थ्यांचे सर्व मूळ प्रमाणपत्रे व पात्रता तपासून प्रवेश देण्यात यावेत.

ह्यानंतर रिक्त असलेल्या प्रवेशीत जागांवर पात्र विद्यार्थ्यांचा प्रवेश महाविद्यालयाने आपल्या स्तरावर गुणवत्तेनुसार (Inter-Se-Merit) करू शकतील.

ह्या महाविद्यालयांच्या Log-in-ID मध्ये ''College Level Admission'' म्हणून Link देण्यात आलेली आहे. ह्या Link मध्ये प्रत्येक प्रवेशित विद्यार्थ्यांचा अर्ज भरून पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश महाविद्यालयाने विद्यापीठाच्या प्रवेशाच्या शेवटच्या तारखेपर्यंत गुणवत्तेनुसार (Inter-Se-Merit) करू शकतील.

विभागात/महाविद्यालयांमध्ये झालेला प्रत्येक प्रवेश हा महाविद्यालयाच्या Log-in-ID मध्ये Upload करण्यात यावा व झालेल्या सर्व प्रवेशाची यादी तीन प्रतींमध्ये प्रवेशाच्या अंतीम तारखेनंतर त्वरित विद्यापीठास सादर करण्यात यावी.

मा. प्र–कुलगुरू तथा सक्षम
अधिकाऱ्यांचे आदेशान्वये

(डॉ. रमण मदने)
सहायक कुलसचिव (म.वि.वि.)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ

::::::